<u>वादीतर्फे श्री.एस.बी.फड वकिल यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरु.</u>

०९. हे खरे की, दि.२३/०७/२००५ रोजी माझी मुळकी ग्रामपंचायत सरपंच म्हणून निवड झाली. हे खरे की, प्रतिवादी क्र.१ बालाजी हे त्यावेळी ग्रामसेवक होते. हे खरे की, सरपंच निवडीचे प्रोसिडींग ग्रामपंचायतमध्ये लिहिले जाते. दि.२५/०८/२००५ रोजी मी सदरचे प्रोसिडींग स्वत:च्या ताब्यात ठेवले, हे खरे आहे. हे खरे की, नि.क्र.६० ही पावती मी प्रतिवादी क्र.१ च्या हक्कात लिहून दिली. आता मला नि.क्र.६० ही पावती दाखवली, त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. दि.२५/०८/२००५ ते दि.३०/०८/२००७ या काळात सदर प्रोसिडींग बुक माझ्या कब्जात होते, याबद्दल मला नेमकेपणाने काळ आठवत नाही. सदरचे प्रोसिडींग बुक मी गटविकास अधिकारी, अहमदपूर यांच्याकडे जमा केले, हे खरे नाही. मी सांगतो की, ते मुळकी ग्रामसेवक श्री.एफ.एम.शेख यांच्याकडे मी अंदाजे दिड वर्षाने दिले. आता मला नि.क्र.६१ हे पत्र दाखवले. त्यावरुन ते प्रोसिडींग बुक मी जमा केल्याचे त्यात लिहिल्याचे दिसून येते. सरपंच पदी निवड झाल्यानंतर माझ्याविरुध्द ७-८ महिन्यांनी अविश्वास ठराव आला. हे खरे की, या अविश्वास ठरावाने माझे सरपंच पद काढून घेण्यात आले. सरपंच पद गेल्यानंतरही मुळकी गावचे प्रोसिडींग बुक माझ्याच ताब्यात होते. मी प्रोसिडींग बुक मला वेळोवेळी कळवून ही जमा करत नाही, म्हणून गटविकास अधिकाऱ्यांनी माझ्याविरुध्द कारवाई करावी म्हणून जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज दिला होता, हे खरे आहे. मी पुन्हा सांगतो की, मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ आणि ३ यांनी माझ्याविरुध्द कोणतीही कारवाई प्रोसिडींग बुकाचा अनुषंगाने केली नाही, याबद्दल मला माहिती नाही. गटविकास अधिकारी, अहमदपूर यांनी प्रतिवादी क्र.१ यांना नि.क्र.६२ हे पत्र देवून मी प्रोसिडींग बुक जमा केले नाही, म्हणून माझ्याविरुध्द गुन्हा नोंद करण्याबद्दल त्यांना आदेशीत केले, याबद्दल मला माहिती नाही. माझे आणि ग्रामसेवक यांचे माझ्या सरपंच पदाच्या काळात चांगले

जमत होते, हे खरे नाही. हे खरे की, प्रतिवादी क्र.३ हे माझ्या सरपंच पदाच्या काळात अहमदपूर पंचायत समिती येथे विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत होते. हे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ची आणि माझी पंचायतीच्या कामाच्या निमित्ताने सतत भेट व्हायची. प्रतिवादी क्र.१ आणि ३ यांचे सुरुवातीपासून आतापर्यंत माझयाशी चांगले संबंध आहेत, हे म्हणणे खरे नाही. प्रतिवादी क्र.१ ने वादीविरुध्द दाखल केलेल्या गु.र.नं.१३१/२००७ मध्ये पोलिसांनी माझे टिपन नोंदविलेले नाही. या गुन्हयाच्या अनुषंगाने पोलिसांना भेटायचा प्रयत्न मी केला नाही. पोलिसांनी या गुन्हयात माझे तपासटिपन जे दाखल केले, ते खोटे आहे. दोषारोपपत्रात अ.क्र.१५ वर माझे नाव साक्षीदार म्हणून नोंद आहे, ते खोटे आहे. दोषारोपपत्राबद्दल मला काही माहिती नाही. दोषारोपपत्रात साक्षीदार म्हणून माझे नाव का आले, हे मला माहिती नाही. माझे नाव दोषारोपपत्रात कोणी नमूद केले, हे मला माहित नाही. प्रतिवादी क्र.१ ने माझे नाव साक्षीदार म्हणून पोलिसांना दिले याबद्दल मला माहिती नाही. हे खरे नाही की, माझ्याशी बोलूनच हे नाव त्यांनी नमूद केले. सदर दिवाणी प्रकरण झाल्यावर माझे नाव दोषारोपपत्रात साक्षीदार म्हणून नमूद आहे, हे मला समजले. मला फौजदारी न्यायालयाकडून समन्स आलेले नाही. हे खरे नाही की, त्या फौजदारी प्रकरणात माझे नाव साक्षीदार म्हणून नमूद आहे, हे मला गुन्हा दाखल झाल्यापासून माहित आहे. प्रतिवादी क्र.१ ची आणि माझी दुश्मनी नाही. मी सांगतो की, मैत्रीही नाही. वादीने नि.क्र.३०/१ पान क्र.१६ यावर काय साक्ष नोंदवली आहे, हे मला माहिती नाही. वादीने नि.क्र.३०/१ पान क्र.१८ यावर काय नमूद आहे, हे मला माहिती नाही. वादीने नि.क्र.३० परिच्छेद क्र.३३ पान क्र.८ मध्ये काय मजकूर आहे, हे आता मला सांगता येत नाही. माझ्या कैफीयतीत काय मजकूर आहे, हे मला माहित आहे. वादीचा सरतपास, उलटतपास काय आहे, हे मला सांगता येणार नाही. वादीच्या साक्षीदाराने याकामी काय साक्ष दिली आहे, हे मला माहित नाही. हे खरे नाही की, माझे शपथपत्रातील मजकुर माझ्या वकिलांनी तयार केला व मी त्यावर सही केली. शपथपत्रातील मजकुराबद्दल मला माहिती नाही, हे खरे नाही. वादी आणि प्रतिवादी क्र.१ यांच्यात प्रोसिडींग बुकावरुन वाद होता, हे मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ हे वादीला

प्रोसिडींग बुकाची प्रमाणित प्रत द्यायला तयार नव्हते, याबद्दल मला माहिती नाही. माझ्या सांगण्यावरुन सदर प्रत ते देत नव्हते, याबद्दल मला माहिती नाही. मी व प्रतिवादी क्र.१ यांच्यावर वादीला प्रमाणित प्रत द्यावी असा शासकीय अधिकाऱ्यांनी दबाव आणला होता, याबद्दल मला माहिती नाही. मी व प्रतिवादी क्र.१ आणि ३ यांनी वादीला या प्रकरणात संगनमताने गुंतवले यास मला माझे सांगणे की, त्यांनी काय केले हे मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी असे केले का हे सुध्दा मला माहिती नाही. सरपंच पद गेल्यानंतर मला प्रोसिडींग बुक ठेवून घेण्याचा अधिकार नव्हता, हे खरे आहे. प्रोसिडींग बुक जमा करायचा ऐवजी अन्य प्रतिवादींशी संगनमत करुन आम्ही वादीवरच गुन्हा दाखल केला, हे म्हणणे खरे नाही. वादीविरुध्द वर्तमानपत्रात गुन्हा दाखल झाल्यावर बातम्या छापून आल्याचे मला माहिती नाही. मला लिहिता-वाचता येते. आमच्या गावात वाचनालय आहे, हे खरे आहे. तेथे वर्तमानपत्र येते हे मला माहिती नाही. हे खरे नाही की, वादीविरुध्द खटला झाल्याचे मी गावात सगळयांना सांगितले. हे खरे नाही की, सगळयांना सांगून मी वादीचे चारीत्र्य हानन केले. वादीने दावापुर्व नोटीस मला पाठवली होती. नि.क्र.७७ ही नोटीस आता मला दाखवली. तसेच, नि.क्र.८० वर माझी सही आहे.

१०. या नोटीसला मी आजतागायत उत्तर दिलेले नाही. वादीविरुध्द प्रोसिडींग बुकबाबत मी पोलिसात तक्रार दिलेली नाही. वादीविरुध्द मी आजअखेर एकही साक्ष दिलेली नाही. वादीने आपली मुले, सूना आणि भावकीविरुध्द दावे केलेले आहेत. त्यात मी साक्षीदार नाही. तो वाद कशाबद्दल आहे, हे मला माहिती नाही. त्यातील पक्षकारांची मला माहिती नाही. त्या दावा खटल्याचे पुढे काय झाले, हे मला माहिती नाही. माझ्याविरुध्द वादीने दिवाणी दावा केलेला नाही. वादीची प्रतिष्ठा माझ्या दृष्टीने पुर्वी होती, तशी आहे. वादी हा गावातील प्रतिष्ठीत इसम आहे, याबद्दल मला माहिती नाही. वादीला कुठल्याही फौजदारी खटल्यामध्ये शिक्षा झालेली नाही, याबद्दल मला माहिती नाही. वादीविरुध्द आजअखेर कोणत्याही न्यायालयात खटले दावे प्रलंबित नाहीत किंवा त्यात शिक्षा झालेली नाही, याबद्दल मला माहिती नाही. वादीला आम्ही केलेल्या खटल्यामुळे त्याचे शेत राजश्री

सावंतला विकून पैसे उभारावे लागले, हे मला माहिती नाही. आता मला दाखवलेले नि.क्र.७४ हे खरेदीपत्र तेच आहे, हे म्हणणे खरे नाही.

<u>उर्वरीत उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.</u>

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरीत/-
(एस.एन.सरडे)
दिनांक १६/०३/२०२५. **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**